REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2024


# यवतमाळ जिल्ह्यातील नागरी केंद्रातील व्यावसायिक संरचनेचे भौगोलिक अध्ययन

**डॉ. ओमप्रकाश बी. मुंदे**
**सहयोगी प्राध्यापक व भूगोल विभाग प्रमुख,**
**नारायणराव राणा महाविद्यालय, बडनेरा रेल्वे.**

**सारांश :**

सध्या जगातील नागरी लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त झालेली आहे आणि १९६० पासून ती सुमारे ३५% वाढली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, भारतात एकूण ३१.१६% लोकसंख्या नागरी भागात आहे. ग्रामीण आणि नागरी भागात व्यवसायाची रचना देखील वेगळी आहे. नागरी व्यवसाय रचनेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे सेवा, नोकरी इत्यादी आहेत.

प्रस्तुत संशोधन निबंधात यवतमाळ शहरातील नागरी केंद्रांची व्यावसायिक संरचना अभ्यासली आहे.




**बीज संज्ञा :** नागरी, व्यावसायिक संरचना, प्राथमिक, द्वितीयक, तृतीयक

## प्रस्तावना

नागरी लोकसंख्येची व्यावसायिक संरचना म्हणजे नागरी भागातील लोकांचे विविध व्यवसायांनुसार असलेले प्रमाण होय. यात मुख्यत्वे सेवा क्षेत्र (तृतीयक व्यवसाय), उद्योग (द्वितीयक व्यवसाय) आणि काही प्रमाणात शेती (प्राथमिक व्यवसाय) यांचा समावेश होतो. नागरी लोकसंख्या ही प्राथमिक व्यवसायांकडून सेवा आणि उद्योग क्षेत्रांकडे वळलेली दिसते, कारण ती ग्रामीण भागातून येणाऱ्या लोकांवर आधारित असते, जेथे शेती हा प्रमुख व्यवसाय असतो.

नागरी प्रदेशातील व्यवसाय रचना ही शहरातील आर्थिक विकासावर परिणाम करत असते. यवतमाळ जिल्ह्याची ग्रामीण आणि नागरी प्रदेशातील व्यावसायिक संरचना वेगळी आहे. शेती आणि इतर प्राथमिक व्यवसाय हे ग्रामीण भागात आढळतात आणि जिल्ह्याच्या नागरी प्रदेशात तृतीयक संबंधित व्यवसाय आढळतात.

## अभ्यास क्षेत्र

यवतमाळ जिल्हा हा विदर्भाचा एक भाग आहे. जिल्ह्याचा अक्षवृतीय विस्तार हा १९°२६' उत्तर ते २०°४२' उत्तर आणि रेखावृत्तीय विस्तार हा ७७°'१८' पूर्व ते ७९°९'पूर्व रेखांशाच्या दरम्यान आहे. यवतमाळ जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या विदर्भाच्या दक्षिण भागात वसलेला असून एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १३५१९ चौ.किमी. आहे. वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात एकूण १६ तालुके असून एकूण लोकसंख्या २७७२३४८ एवढी आहे.

अमरावती व वर्धा जिल्हा उत्तरेस, वाशिम व हिंगोली जिल्हा पश्चिमेस नांदेड जिल्हा व तेलंगणा राज्य आणि चंद्रपूर जिल्हा यवतमाळ जिल्ह्याच्या पूर्वेस वसलेले आहेत.

## उद्दिष्ट्ये

यवतमाळ जिल्ह्यातील नागरी केंद्रातील व्यावसायिक संरचनेचे अध्ययन करणे हे प्रस्तुत अभ्यासाचे मुख्य उद्दिष्ट्य आहे.


## माहिती स्त्रोत व विधीतंत्र

प्रस्तुत संशोधनासाठी उपयोगात आलेली माहिती ही द्वितीयक स्त्रोताद्वारे प्राप्त करण्यात आलेली आहे. जनगणना अहवाल यवतमाळ जिल्हा २०११ आणि जनगणना विभागाकडून प्राप्त झालेली २०२१ ची प्रक्षेपित आकडेवारीमधून प्रस्तुत संशोधनाची माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

प्राथमिक द्वितीयक आणि तृतीयक व्यवसायातील कामगारांचे प्रमाण हे एकूण कामगारांसोबत दर्शविलेले आहे. हे प्रमाण सारणी मध्ये आणि त्याचे वितरण अभ्यास क्षेत्राच्या नकाशात दर्शविलेले आहे. सारणी क्रमांक १ व २ मध्ये अभ्यास क्षेत्रातील नागरी केंद्रे दिलेली आहेत.

## यवतमाळ जिल्ह्यातील नागरी लोकसंख्या आणि नागरी केंद्रे

यवतमाळ शहरात सर्वाधिक नागरी लोकसंख्या केंद्रित झालेली आहे, कारण जिल्ह्यातील  हे सर्वात मोठे नागरी क्षेत्र असून ते जिल्हा मुख्यालयाचे ठिकाण आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पिंपळगाव आणि देवगिरी नागरी केंद्रांमध्ये नागरी लोकसंख्येचे सर्वात कमी वितरण आढळते.




**नागरी केंद्रातील व्यावसायिक संरचना (२०११)** वर्ष २०११ मध्ये नागरी केंद्रांमधील तृतीयक कामगारांची टक्केवारी २००१ च्या तुलनेत कमी झाल्याचे आढळून आले आहे. या वर्षी ७६.३३% तृतीयक क्षेत्रात, १८.५९% प्राथमिक आणि ५.०८% दुय्यम क्षेत्रात आढळले आहेत. मागील जनगणनेच्या तुलनेत प्राथमिक आणि द्वितीयक क्षेत्रातील कामगार वाढले आहेत.


याकाळात पांढरकवडा, घाटंजी, दारव्हा येथे प्राथमिक कामांमध्ये (४०% पेक्षा जास्त) कामगार आढळून येतात. यावर्षी नेर शहराचा नव्याने नागरी क्षेत्रात समावेश करण्यात आला होता आणि या नागरी केंद्रात प्राथमिक क्षेत्रातील ४०% पेक्षा जास्त कामगार होते. देवगिरी आणि दिग्रस केंद्रांमधील प्राथमिक क्षेत्रातील कामगार ३५ ते ४०% होते. उर्वरित केंद्रांमध्ये एकूण कामगारांपेक्षा २५% पेक्षा कमी कामगार हे प्राथमिक व्यवसायात होते. प्राथमिक कामगारांची सर्वात कमी टक्केवारी उमरसरा केंद्रात होती.

**सारणी क्रमांक १**

**यवतमाळ जिल्हा – नागरी केंद्रातील व्यावसायिक संरचना (२०११)**

| नागरी केंद्रे | प्राथमिक | द्वितीयक | तृतीयक |
|---|---|---|---|
| यवतमाळ | ४.४१ | १.९२ | ९३.६७ |
| वणी | ७.१२ | ३.२८ | ८९.६० |
| पांढरकवडा | ४७.३३ | ३. ८६ | ४८. ८१ |
| घाटंजी | ४९.९७ | २.२८ | ४७.७५ |
| उमरखेड | २०.६१ | १.९१ | ७७.४८ |
| पुसद | २१.०७ | २.०३ | ७६. ८९ |
| दिग्रस | ३५.२२ | १.२८ | ६३.५० |
| दारव्हा | ४६.७६ | १.१५ | ५२.०९ |
| राजूर | १४.९६ | १. ८८ | ८३.१५ |
| उमरसरा | ३.०४ | ४६.३८ | ५०.५८ |
| वडगाव | ६.२२ | २.७८ | ९१.०१ |
| वाघापूर | १६.९८ | ३.५७ | ७९.४५ |
| श्रीरामपूर | २१.०३ | ३.९० | ७५.०७ |
| देवगिरी | ३८.५६ | २.१४ | ५९.३१ |
| लोहारा | ७.६० | २. ८४ | ८९.५७ |
| नेर | ४५.०२ | ३.४५ | ५१.५३ |
| **एकूण** | **१८.५९** | **५.०८** | **७६.३३** |

स्त्रोत: - District Census Handbook of Yavatmal District, २०११




## नागरी केंद्रातील व्यावसायिक संरचना (२०२१)

सारणी क्रमांक २ मध्ये अभ्यास क्षेत्रातील नागरी केंद्रानुसार व्यावसायिक संरचना दर्शविलेली आहे.

**सारणी क्रमांक २**


**यवतमाळ जिल्हा – नागरी केंद्रातील व्यावसायिक संरचना (२०२१)**

| नागरी केंद्रे | प्राथमिक | द्वितीयक | तृतीयक |
|---|---|---|---|
| यवतमाळ | ५.३३ | १.९६ | ९२.७१ |
| वणी | ७.६६ | ३.२४ | ८९.१ |
| पांढरकवडा | ४८.३६ | ३.५४ | ४८.१ |
| घाटंजी | ४९.९५ | २.२५ | ४७. ८ |
| उमरखेड | २१.६३ | १.९५ | ७६.४२ |
| पुसद | २२.०२ | २.०६ | ७५.९२ |
| दिग्रस | ३५.२१ | १.२४ | ६३.५५ |
| दारव्हा | ४७.४४ | १.११ | ५१.४५ |
| राजूरा | १५.२३ | १. ८१ | ८२.९६ |
| उमरसरा | ४.५६ | ४८.६९ | ४६.७५ |

| | | | |
|---|---|---|---|
| वडगाव | ७.५२ | ३.२४ | ८९.२४ |
| वाघापूर | १७.४१ | ४.१५ | ७८.४४ |
| श्रीरामपूर | २१.४४ | ३.७८ | ७४.७८ |
| देवगिरी | ३९.६१ | २.११ | ५८.२८ |
| लोहारा | ८.४१ | ३.०५ | ८८.५४ |
| नेर | ४५.६३ | ३.६७ | ५०.७ |
| **एकूण** | **१९.२३** | **५.६८** | **७५.०९** |

स्त्रोत: - Census of India, Provisional Census Data २०२१

२०११ च्या तुलनेत २०२१ मध्ये द्वितीयक व तृतीयक व्यवसायातील कामगारांचे प्रमाण वाढलेले आढळते. यवतमाळ शहरातील प्राथमिक व्यवसायातील कामगारांचे प्रमाण हे २०२१ मध्ये वाढलेले आणि तृतीयक व्यवसायातील प्रमाण कमी झालेले आढळते. याकाळात यवतमाळ शहराचे क्षेत्रफळ सुमारे आठ पटीने वाढले. आजूबाजूचे क्षेत्र शहरात समाविष्ट करण्यात आले, त्यामुळे त्या क्षेत्रातील प्राथमिक व्सायातील कामगारांचे नागरी लोकसंख्येत समावेश झाल्याने हे प्रमाण वाढलेले आढळते.




याकाळात प्राथमिक व्यवसायातील कामगारांचे प्रमाण हे १९.२३% होते वयामध्ये आधीच्या तुलनेत ०.६४% ने वाढ झालेली दिसून येते. तर द्वितीयक व्यवसायातील कामगारांचे प्रमाण हे ५.६८% होते व यामध्ये आधीच्या तुलनेत ०.६०% ने वाढ

झालेली आढळते. तृतीयक व्यवसायातील कामगारांचे प्रमाण हे ७५.०९% असून यामध्ये आधीच्या काळापेक्षा १.२४% ने घट झालेली आढळून येते.

या वर्षात उमरसरा (४८.६९%) या नागरी केंद्रात सर्वाधिक द्वितीयक व्यवसायातील कामगार असलेले आढळतात. जिल्ह्यातील यवतमाळ, उमरखेड, पुसद, उमरसरा, वडगाव, वाघापूर, लोहारा आणि नेर या नागरी केंद्रातील द्वितीयक व्यवसायातील कामगारांचे प्रमाण हे वर्ष २०११ च्या तुलनेत वाढलेले आहे. इतर नागरी केंद्रात मात्र यामध्ये काही प्रमाणात घट झालेली आढळून येते.

जिल्ह्यातील प्रत्येक नागरी केंद्रांमध्ये तृतीय श्रेणी कामगारांची टक्केवारी कमी झाली आहे. यवतमाळ आणि वडगाव केंद्रांमध्ये (९०% पेक्षा जास्त) तृतीयक क्षेत्रात सर्वाधिक कामगार आढळले आहेत. घाटंजी (५०% पेक्षा कमी) नागरी केंद्रात तृतीय श्रेणी कामगारांची सर्वात कमी टक्केवारी आढळून येते. जिल्ह्यातील उर्वरित केंद्रांमध्ये ही टक्केवारी ५० ते ९०% आहे.

## निष्कर्ष आणि सूचना

नागरी भागातील व्यावसायिक संरचना ही असमान आहे कारण नागरी लोकसंख्येचे वितरण देखील असमान आहे. २०११ आणि २०२१ या दोन्ही वर्षांमध्ये नागरी भागातील मुख्य व्यवसाय हा तृतीयक आहे. परंतु २०२१ मध्ये तो २०११ च्या तुलनेत कमी झाल्याचे दिसून आले.

व्यावसायिक संरचनेतील बदल हा तृतीयक व्यवसाय क्षेत्रांची अस्थिरता दर्शविते. कमी उत्पन्नामुळे अनेक कामगार आपले मूळ व्यवसाय बदलतात. प्रत्येक व्यवसायात स्थिरता असणे आवश्यक आहे कारण प्राथमिक, द्वितीयक आणि तृतीयक हे सर्व एकमेकांशी संबंधित आहेत. प्रत्येक व्यवसायाच्या समतोल विकासामुळे प्रत्येक कामगाराच्या दरडोई उत्पन्नात वाढ होते. जिल्ह्यातील नागरी केंद्रांमध्ये घरगुती उद्योग आणि स्वयंनिर्भर रोजगाराच्या संधी वाढवणे आवश्यक आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येची व्यावसायिक संरचना ही मुख्यत्वे कृषी आणि संबंधित उद्योग, सेवा क्षेत्र आणि व्यापारावर आधारित आहे. जिल्ह्यात 'कॉटन सिटी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरांमध्ये कापूस उद्योगाचे महत्त्व आहे. नागरी भागात अनेक व्यावसायिक विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत, परंतु कृषी क्षेत्राचा प्रभाव अजूनही लक्षणीय आहे, कारण अनेक ग्रामीण लोकसंख्या शहरांमध्ये स्थलांतरित होत आहे.

प्रक्रिया उद्योग, कृषी उद्योगांच्या वाढीमुळे जिल्ह्यातील नागरी केंद्रांमध्ये व्यवसाय संरचना सुधारण्यास मदत होईल. यामुळे त्यासंदर्भात उपाययोजना करणे आवश्यक आहे.

## संदर्भ


१) भुयार संजीव, (२०१७), "लोकसंख्या गुणवत्ता आणि संसोधनाची उपयोगिता", दैनिक हिंदुस्थान, दि. ११/०७/२०१७. पृ.क्र. .

२) District Census Handbook and Village Directory (2011), Yavatmal District

३) Gibbs J. P. (1963), “The Evolution of Population Concentration”, Economic Geography, Vol. 39, No. 2 (Apr., 1963), Pp. 119-129

४) Rao M. K. (2019), “Poverty Slums and Occupational Structure”, Indian Books and Periodicals.

५) Saxena H. M. (2018), “Economic Geography”, Rawat Publications, Jaipur.

६) Sidhhartha K. (2018), “Economic Geography”, Kitab Mahal, New Delhi.